जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, सिंधुदुर्ग
(उपचिटणीस शाखा)
कार्यालय दूरध्वनी क्र. 02362/228589 ई-मेल - sindhudurgdc.gmail.com

क्रमांक उचिशा/का. व सु./मनाई/म.मोर्चा/2020

वाचले:- १) महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) (3)
२) पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग यांचे पत्र जा.क्र.जिविशा/का.व सु./मनाई आदेश/2545/2020, दि. 08/10/2020.

## अधिसूचना

ज्याअर्थी पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग, यांनी वरील उपोद्घात अनु.क्रं. 2 अन्वये, माझे असे निदर्शनांस आणले आहे की, दिनांक 09.09.2020 रोजी मराठा आरक्षणास मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या स्थगितीमुळे मराठा समाजातील लोकांमध्ये नाराजी असून, महाराष्ट्रात सर्वत्र विविध आंदोलने केली जात आहेत. मराठा समाजाकडून दिनांक 10.10.2020 रोजी महाराष्ट्र बंद ची हाक देण्यात आलेली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात सकल मराठा समाजाच्या वतीने दिनांक 10.10.2020 रोजी तालुका निहाय महाराष्ट्र बंद आंदोलन पुकारले आहे. जिल्हयात आयोजीत करण्यात आलेले महाराष्ट्र बंद आंदोलन यशस्वी करणेकरीता सदर आंदोलनात जास्तीत जास्त मराठा बांधवांना सहभागी होणेबाबत मराठा समाजाच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांचेकडून आवाहन करण्यात येत आहे. सदर दिवशी सकल मराठा समाजाच्या आंदोलकांकडून ठिकठिकाणी चक्काजाम, झाडे तोडणे व टायर पेटवून वाहतूकीस अडथळे निर्माण करणे असे आंदोलनात्मक कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर आंदोलनाच्या वेळी जिल्हयात कोणताही अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होऊ नये याकरीता पोलीस विभागाकडून बंदोबस्ताचे नियोजन करणेत येणार आहे.

तसेच दिनांक 11.10.2020 रोजी होणा-या एम.पी.एस.सी परीक्षेस मराठा आंदोलकांकडून विरोध होत असून जिल्हयात होणा-या परीक्षेच्या अनुषंगाने परीक्षा केंद्रावर बंदोबस्त व पेट्रोलिंगचे नियोजन करण्यात येणार आहे. तरी जिल्हयातील मराठा बांधवांकडून होणा-या महाराष्ट्र बंद च्या दरम्यान रास्तारोको, चक्काजाम, मोर्चा, निदर्शने, रस्त्यावर टायर पेटवणे, झाडे तोडणे या सारखे आंदोलनात्मक प्रकार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच एम.पी.एस.सी परीक्षेच्या अनुषंगाने आंदोलने होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आंदोलन दरम्यान कोठेही अनुचित प्रकार घडू नये जिल्हयातील जातीय सलोखा आणि कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित राहावी याकरीता सिंधुदुर्ग जिल्हयाचे संपूर्ण भूभागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) (अ) ते (फ) आणि 37 (3) प्रमाणे मनाई आदेश निर्गमित होणेस विनंती केलेली आहे.

आणि ज्याअर्थी वरील कालावधीत कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे अशी माझी खात्री झालेली आहे. त्याअर्थी, मी के. मंजुलक्ष्मी, जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग मला प्राप्त असलेल्या शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951चे कलम 37 (1) (3) नुसार दिनांक 09/10/2020 रोजी ~~सकाळी~~ 00-00 ते दिनांक 11/10/2020 रोजी रात्रौ 24-00 जेपर्यतच्या कालावधीसाठी सिंधुदुर्ग जिल्हयाचे संपूर्ण भूभागात खालील कृत्य करण्यांस मनाई करीत आहे.

कलम ३७(१)

अ) शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठया किंवा लाठया किंवा शारीरीक इजा करण्यांसाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बाळगणे.

ब) अंग भाजून टाकणारा पदार्थ किंवा कोणताही स्फोटक पदार्थ घेवून फिरणे.

क) दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे.

ड) व्यक्तींची किंवा प्रेते किंवा आकृती किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, (ज्या कारणामुळे समाजाच्या भावना दुखविली जाण्याची शक्यता असते.)

इ) सार्वजनिक रितीने आक्षेपार्ह घोषणा करणे, गाणी म्हणणे किंवा वादय वाजवीणे.

कलम३७(३)

अ) सिंधुदूर्ग जिल्हयामध्ये पाच अगर पाचाहून जादा लोकांनी एकत्र जमा होणे, जमाव करणे मिरवणूका काढणे व सभा घेणे.

आ) हा हुकूम ज्या सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये व अधिकार बजावणीचे संदर्भात उपनिर्दीष्ट वस्तू हाताळाव्या लागतात आणि एकत्र जमावे लागते व ज्या व्यक्तींनी पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग अगर संबधीत उपविभागीय पोलीस अधिकारी यांना संबधीत विभागाचे पोलीस निरीक्षक किंवा सक्षम पोलीस प्राधिकारी यांची परवानगी घेतलेली आहे. अशा व्यक्तींना आणि लग्न इत्यादी धार्मिक समारंभ, प्रेतयात्रा यांस लागू पडणार नाही.

वरील कालावधीतील मिरवणूकांना परवानगी देण्यांचे अधिकार तसेच ध्वनीक्षेपक वाजविण्यांस परवानगी देण्यांचे अधिकार पोलीस अधीक्षक सिंधुदुर्ग तसेच त्यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांस व सिंधुदुर्ग जिल्हयातील पोलीस ठाणे प्रभारी अधिका-यांस राहील.

वरील आदेशाचे जो कोणी उल्लंघन करील तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 135 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

हा आदेश आज दिनांक 08 ऑक्टोबर, 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी दिला असे.

(के. मंजुलक्ष्मी)
**जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग.**

प्रत- 1) पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग यांजकडे प्रसिध्दीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.
2) जिल्हा माहीती अधिकारी, सिंधुदुर्ग यांजकडे विनामुल्य प्रसिध्दीसाठी रवाना.
3) उपविभागीय दंडाधिकारी कुडाळ/सावंतवाडी/कणकवली यांजकडे आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.